RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ७, अंक ६६] शनिवार, डिसेंबर ११, २०२१/अग्रहायण २०, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक १०३**

**प्राधिकृत प्रकाशन**

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

**शहर विकास विभाग**

**अधिसूचना**

(क्रमांक ठामपा/शविवि/क्लस्टरसेल/६६५)

ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारीत विकास योजना शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ (१) नुसार (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केला आहे.) शासन निर्णय क्रमांक टिपीएस-१२९७/१३१९/सीआर-१४८/९७/नवि-१२, दिनांक ४ ऑक्टोबर, १९९९ अन्वये मंजूर केली असून, ती दिनांक २२ नोव्हेंबर १९९९ पासून अंमलात आहे. तसेच सुधारीत विकास योजनेतील वगळलेल्या क्षेत्राची विकास योजना शासन निर्णय क्रमांक टिपीएस-१२०१/२७४/सीआर-२८/२००९/नवि-१२, दिनांक ३ एप्रिल, २००३ अन्वये शासनाने उक्त अधिनियमानुसार मंजूर केली असून ती दिनांक १४ मे, २००३ पासून अंमलात आली आहे. (यापुढे "उक्त मंजूर विकास योजना" असा केला आहे.)

आणि ज्याअर्थी, ठाणे शहराची विकास नियंत्रण नियमावली शासनाने उक्त अधिनियमाचे कलम ३१(१) अन्वये अधिसूचना क्रमांक टिपीएस/१२९५/सीआर-२२२/९४/नवि-१२, दिनांक २८ एप्रिल १९९५ अन्वये ठाणे शहराच्या प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीत काही फेरबदल करुन उक्त अधिनियमान्वये मंजूरी दिली आहे व सदर नियमावली दिनांक १ जून, १९९५ पासून अंमलात आहे. (यापुढे "उक्त नियमावली" असा केला आहे.)

आणि ज्याअर्थी, ठाणे शहरातील मोठ्या प्रमाणावर असलेल्या जुन्या, मोडकळीस आलेल्या आणि अनधिकृत इमारतींचे नियोजनबद्ध आणि सुनियंत्रित पद्धतीने पुनर्विकास होण्याकरिता, उक्त नियमावलीतील विनियम क्र १६५ मध्ये "नागरी पुनरुत्थान योजना" करिता विशेष नियमाची तरतुद महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) (क) (क) (ग) चे तरतुदीनुसार वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन शासन अधिसूचना क्र. टिपीएस/१२१३/२७२६/सी.आर.-२४/१४, नवि-१२, दिनांक ५ जुलै २०१७ अन्वये मंजूर करण्यात आली आहे. (यापुढे याचा उल्लेख "उक्त विशेष नियमावली" असा केला आहे.)

आणि ज्याअर्थी, उक्त विशेष नियमावलीतील तरतुदीनुसार नागरी पुनरुत्थान योजना व त्याअंतर्गत विकसित / पुनर्विकसित होण्याचे दृष्टीने आवश्यक असलेल्या इमारतींचे आणि / किंवा बांधकामांचे नागरी पुनरुत्थान योजनेचा अंतर्भाव असलेले आराखडे तयार करणेचे अधिकार आयुक्त यांना आहेत व त्याअनुषंगाने आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी ठाणे महानगरपालिका हद्दीत उक्त विशेष नियमावलीतील तरतुदीनुसार एकूण ४४ (चव्वेचाळीस) नागरी पुनरुत्थान आराखडे तयार केले असून (यापुढे उक्त "आराखडे" असा

केला आहे.) व जाहीर सूचनेद्वारे दिनांक ५ मे २०१८ रोजी **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध करून त्यावर जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यात आलेल्या होत्या.

आणि ज्याअर्थी, प्राप्त हरकती/सूचनांच्या अनुषंगाने वैधानिक कार्यवाही करुन ठाणे महानगरपालिकेने दिनांक २ मार्च २०१९ रोजीचे पत्रान्वये उक्त ४४ आराखड्यांपैकी कोपरी (यु.आर.पी.१), राबोडी (यु.आर.पी.३), टेकडी बंगला (यु.आर.पी.६), हाजुरी (यु.आर.पी.११), किसननगर (यु.आर.पी.१२) व लोकमान्य नगर (यु.आर.पी.१३), या सहा नागरी पुनरुत्थान आराखड्यांना शासनाची अंतिम मान्यता मिळणेचा प्रस्ताव सादर केला होता. (यापुढे त्याचा उल्लेख "उक्त सहा आराखडे" असा केला आहे.)

आणि ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिकेत शासनास सादर केलेल्या उक्त ०६ नागरी पुनरुत्थान आराखडयांच्या क्षेत्रापैकी कोपरी येथील नागरी पुर्नरुत्थान आराखड्यामधील अधिसूचीत विशेष आर्थिक क्षेत्राचा भाग वगळून उक्त आराखडयांच्या सुधारीत हद्दींना अधिसूचीत करण्यास शासनाने त्यांचेकडील पत्र क्रमांक टीपीएस १२१९/८९३/प्र.क्र.१५/२०/नवि-१२ दिनांक ४ फेब्रुवारी २०२० अन्वये सहमती दर्शविली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त विशेष नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. १(ब) (ब) मध्ये, नागरी पुनरुत्थान योजना तयार करण्याचे व अधिसुचित करण्याचे व त्यात आवश्यकतेनुसार वेळोवेळी सुधारणा करण्याचे अधिकार आयुक्त यांना असल्याचे उल्लेखित आहे.

आणि त्याअर्थी, ठाणे शहराच्या उक्त कोपरी (यु.आर.पी.१), राबोडी (यु.आर.पी.३), टेकडी बंगला (यु.आर.पी.६), हाजुरी (यु.आर.पी.११), किसननगर (यु.आर.पी.१२) व लोकमान्य नगर (यु.आर.पी.१३) या नागरी पुनरुत्थान आराखड्यांच्या सुधारीत हद्दी या अधिसूचनेद्वारे खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसूचीत करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | यु.आर.पी. क्र. | यु.आर.पी. नाव | नियोजन प्रभाग क्र. | प्रारुप प्रस्तावानुसार चे क्षेत्र (हे.) | सुधारीत केल्यानुसार अधिसूचीत करावयाचे क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०१ | कोपरी | १ | ७४.६३ | ४२.८५ |
| २ | ०३ | राबोडी | २ | ३५.४० | ३५.४० |
| ३ | ०६ | टेकडी बंगला | २ | ४.१७ | ४.१७ |
| ४ | ११ | हाजुरी | ३ | ९.२४ | ९.२४ |
| ५ | १२ | किसननगर | ३ | १३२.३७ | १३२.३७ |
| ६ | १३ | लोकमान्य नगर | ३ | ६०.५१ | ६०.५१ |

सदर आराखडयांच्या सुधारीत हद्दी दर्शविणारे नकाशे जनतेच्या अवलोकनार्थ खालील ठिकाणी, सदरची अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्धी झालेपासून ३० दिवसांकरीता ठेवण्यात आली आहे.

(१) सहसंचालक, नगररचना, क्लस्टर सेल, विशेष प्रकल्प-विभाग कार्यालय, तिसरा मजला, ओसवाल पार्कजवळ, पोखरण रस्ता क्र. २, माजिवडा, ठाणे (प.), ४०० ६०१ यांचे कार्यालय, माजीवाडा, ठाणे.

(२) शहर विकास विभाग, चौथा मजला, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

(३) नौपाडा-कोपरी प्रभाग समिती / उथळसर प्रभाग समिती / वागळे प्रभाग समिती / लोकमान्य सावरकर नगर प्रभाग समिती, कार्यालय.

ही अधिसूचना व अधिसूचीत नकाशे *www.tmctp.thanecity.gov.in* या संकेतस्थळावर सुद्धा उपलब्ध आहेत.

**डॉ. विपिन शर्मा,**
आयुक्त
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे,
दिनांक ९ नोव्हेंबर २०२०

# THANE MUNICIPAL CORPORATION TOWN DEVELOPMENT DEPARTMENT

*NOTIFICATION*

(No. TMC/TDO/Cluster Cell/665)

Whereas, the Revised Development Plan of the Thane City has been sanctioned by the Government of the Urban Development Department, under section 31 (1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No. TPS-1297/1319/CR-148/97/UD-12, dated 4th October 1999, which has come into force with effect from 22nd November 1999, and the Excluded Part (EP) of the said Development Plan has been sanctioned under the said Act *vide* Government Notification No. TPS/1201/1274/CR-28/2001/UD-12, dated 3rd April 2003 which has come into force with effect from the 14th May 2003; (hereinafter referred to as "the said sanctioned development plan");

And whereas, the Development Control Regulations of Thane Municipal Corporation has been sanctioned by the Government after making some modifications in draft Development Control Regulations of Thane city *vide* Urban Development Department, *vide* Notification No. TPS/1294/1259/CR-222/94/UD-12, dated 28th April 1995 under section 31(1) of the said act which has come into force with effect from the 1st June 1995 ; (hereinafter referred to as "the said regulations");

And whereas, for the purpose of redevelopment in a planned and controlled manner of large numbers of old, dilapidated and unauthorized buildings of Thane city, provision of special regulation is made in regulation No. 165 of the said regulations for "urban renewal scheme" by following legal and due procedure under section 37(1)(AA)(c) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 and accordingly notified *vide* the Government Notification No. TPS/1213/2726/CR-24/12 UD-12, dated 5th July 2017. (hereinafter referred to as "the said special regulations");

And whereas, the commissioner is empowered to prepare urban renewal plan which includes necessary development/redevelopment of buildings and/or constructions under urban renewal plan *vide* provisions of the said special regulations and accordingly the Commissioner, Thane Municipal Corporation has prepared 44 (forty four) Urban Renewal Plans in Thane Municipal Corporation limit. (hereinafter referred to as "the said plans"), and published in *Maharashtra Government Gazette*, dated 5th May 2018 and invited suggestions/objections from public on it;

And whereas, after following due procedure on received suggestions/objections, Thane Municipal Corporation has submitted Six Urban Renewal Plans out of 44 Urban Renewal Plans namely Kopri (URP-1), Rabodi (URP-3), Tekadi Bungalow (URP-6), Hajuri (URP-11), Kisan Nagar (URP-12) and Lokmanya Nagar (URP-13) to Government for final approval *vide* letter date 2nd March 2019 (hereinafter referred to as "the said six URPs") ;

And whereas, Government has given his consent to notify revised boundaries of the said six URPs, excluding notified special economic zone area from Kopri URP, *vide* letter No.TPS1219/893/CR 15/20/UD12, dated 4th February 2020 ;

And whereas, as mentioned in the regulation No. 1(*b*)(*b*) of the said Special Regulations, the Commissioner can prepare and notify the Urban Renewal Plans, and revise the same, as and when required.

And therefore, the revised boundaries of the said Six Urban Renewal Plans namely Kopri (URP-1 ), Rabodi (URP-3), Tekadi Bungalow (URP-6), Hajuri (URP-11), Kisan Nagar (URP-12) and Lokmanya Nagar (URP-13) of Thane City are hereby notified as mentioned in table below :–

| Sr. No. | URP No. | URP Name | Planning Sector No. | Area as per Draft proposal (hect.) | Revised Area to notified (hect.) |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | 1 | Kopri | 1 | 74.63 | 42.85 |
| 2 | 3 | Rabodi | 2 | 35.40 | 35.40 |

| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 6 | Tekadi Bungalow | 2 | 4.17 | 4.17 |
| 4 | 11 | Hajuri | 3 | 9.24 | 9.24 |
| 5 | 12 | Kisan Nagar | 3 | 132.37 | 132.37 |
| 6 | 13 | Lokmanya Nagar | 3 | 60.51 | 60.51 |

The plans showing revised boundaries of said plans are kept for inspection by General public for next 30 days from publication of this notification in *Maharashtra Government Gazette* at following places.

1. Office of the Joint director of Town Planning, Cluster cell, Special project office, 3rd floor, near oswal park, Pokharn road No.2, Majiwada, Thane (W.) 400 601.

2. Town development department, 4th floor, Thane Municipal Corporation, Thane.

3. Naupada-Kopri Ward office/Uthalsar Ward office/Wagale Ward office/Lokmanya Savarkar Nagar Ward office.

This Notification and Notified plans are also available on website *www.tmctp.thanecity.gov.in*

Dr. VIPIN SHARMA,
Commissioner,
Thane Municipal Corporation.

Thane,
dated 9th November 2020.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.